| | |
|---|---|
| | **सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग**<br>प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी |

जा.क्र.कर्ज ९९९/३२/३५१/**१४१२**/२०१४-१५ दिनांक -१/०७/२०१४

**- परिपत्रक क्र. ११ -**

**विषय :-** आधुनिक संगणकीकरणाचे ज्ञान होणेसाठी टॅब खरेदीकरीता कर्ज पुरवठा करणेबाबत.

प्राथमिक शाळांपासून संगणक हा विषय मुलांना शिकवला जात आहे. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये विविध संस्था, बँका आता संगणकीकृत होत आहेत. त्यामुळे सर्वांनाच संगणकाचे ज्ञान असणे अत्यावश्यक झालेले आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी संगणक हे अत्यावश्यक साधन झालेले आहे. संगणकाबरोबरच सुलभरित्या हाताळता येण्यासाठी सद्या विद्यार्थ्यांमध्ये **'टॅब'** लोकप्रिय होत आहे. विद्यार्थी टॅब खरेदीकडे वळत आहेत. मात्र आर्थिक अडचणींमुळे पालक मुलांसाठी टॅब खरेदी करू शकत नाहीत. सदरची बाब विचारात घेवून बँकेने संगणक खरेदी योजनेप्रमाणेच **'टॅब'** खरेदीसाठी सुलभतेने कर्ज पुरवठा करणेकरीता मा. संचालक मंडळ सभा दि. २६.०६.२०१४ मधील निर्णयानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे.

**०१. योजनेचे नांव :**

**" संगणक - टॅब खरेदी कर्ज योजना"** असे राहील.

**०२. योजनेचा उद्देश :**

सदर योजनेमध्ये शिक्षण घेत असलेले सर्व विद्यार्थी तसेच त्यांचे पालक, शिक्षक व अन्य नागरिक ही सहभाग घेवू शकतील.

**०३. कर्ज कारण :**

मान्यता प्राप्त कंपनीचा टॅब खरेदी करणेसाठी.

**०४. कर्ज कालावधी :**

सदरची योजना ही मर्यादित काळासाठी राबविण्यात येणार असून, सदर योजनेचा कालावधी दि. १ जुलै ते ३१ मार्च २०१५ असा राहील.

**०५. कर्ज मर्यादा :**

सद्यस्थितीत टॅबची बाजारातील किंमत सर्वसाधारणतः रू. ५०००/- ते रू. २००००/- पर्यंत आहे. विद्यार्थ्यांकरीता उपयोगी ठरणाऱ्या नवनीत अभ्यासक्रम असलेले टॅब ही बाजारात उपलब्ध आहेत. बँकेकडून कोटेशनच्या ९०% पर्यंत किंवा जास्तीत जास्त रू. २०,०००/- पर्यंतचे कर्ज मंजूर करण्यात येईल.

**०६. कर्ज परतफेड :**

कर्जाची परतफेड समान मासिक हप्ता पध्दतीने (EMI) केली पाहिजे. कर्जाचा कालावधी जास्तीत जास्त २ वर्ष (२४ महिने) राहील.

**०७. व्याजदर :**

सदर कर्जाकरीता व्याजदर ११% राहील. रू. १०,०००/- कर्जासाठी २४ महिने मुदतीकरीता मासिक हप्ता (EMI) रू. ४६६/- राहणार आहे.

**०८. कर्ज वसूली :**

कर्जाची वसूली मासिक हप्ता (EMI) पध्दतीने केली जाईल. काही वेळा कंपन्यांकडून बँक कर्जाच्या व्याजाची रक्कम ॲडव्हान्स स्वरूपात भरणा करतात. त्यामुळे लाभार्थ्यास केवळ मुद्दल रक्कम भरणा करावी लागते व कर्ज शून्य टक्केने उपलब्ध होते. अशा वेळी संबंधित कंपनीकडून

मिळणाऱ्या व्याजाची रक्कम प्रथम कर्ज खाती भरणा करून घेवून तद्नंतर लाभार्थ्यांकडून दरमहा मुद्दल रक्कमेचे हप्ते भरणा करून घेणेत यावेत.

०९. **जामिनदार :**

१. कर्जदार विद्यार्थी असल्यास त्यासाठी एक पालक जामीनदार घेणेत यावा. सदरचे जामीनदार हे बँकेचे खातेदार असावेत. जामीनदारांकडून दरमहा मासिक हप्ता परतफेडची निश्चिती असावी, अन्यथा एक जादा नोकरदार जामीनदार घ्यावा.

२. कर्ज मागणीदार नोकरदारांचा पगार आपल्या बँकेत जमा होत असल्यास जामीनदार आवश्यक नाही.

१०. **इतर मुद्दे :**

०१. कर्जमागणीदार तसेच जामिनदार पालक नोकरदार असल्यास पगाराचा दाखला, शेतकरी असल्यास ७/१२ उतारा सादर करावा.

०२. अर्जदाराला रू. १००/- चे स्टॅम्पपेपरवर बँकेच्या छापील नमुन्यातील कर्जरोखा करावा लागेल. संबंधीत कर्जदाराकडून आवश्यक दस्तऐवज घेवून कर्ज देणेत येईल. अधिकारपत्र, प्रॉमिसरी नोटस, कर्जरोखा, कर्ज मंजूरी अटी मान्यतेबाबत पत्र इत्यादी दस्तऐवज घेणेत यावेत. अर्जदार यांचेकडून टॅबचे नजरगहाणखत साध्या पेपरवर घेणेत यावे.

काही कारणासाठी सलग मासिक तीन हप्ते वसुल झाले नाही तर जामिनदार यांच्या वेतनातून कर्जहप्ता व व्याज वसूल केले जाईल.

०३. या योजनेखाली मंजूर कर्जाची रक्कम परस्पर विक्रेत्यास/पुरवठादारास आदा केली जाईल.

०४. सदरचे कर्ज हे MT LOAN FOR COMPUTER PURCHASE (IND) या हेड खाली दाखवावयाचे असून कर्जासाठी डे बुक कोड नं. **१९८१८** व कर्ज कोड नं. **१२२२००ओ९९डब्ल्यू** असा राहील.

**अर्जदारांकडून घ्यावयाचे कागदपत्र –**

०१. कर्ज मागणी अर्ज.

०२. अर्जदार विद्यार्थी असल्यास शिक्षण घेत असलेबाबतचा अद्यावत पुरावा उदा. कॉलेज आयकार्ड, चालू शैक्षणिक वर्षातील ॲडमिशन पावती इ.

०३. जामीनदार नोकरदार असल्यास पगाराचा दाखला, ठेवीदार असल्यास ठेव पावती झेरॉक्स, व्यवसायिकांसाठी निश्चित उत्पन्नाबाबतचा पुरावा (इन्कम टॅक्स रिर्टन), व शेतकरी असल्यास ७/१२ उतारा.

०४. कर्ज उचलीच्यावेळी रू. १००/- च्या बॉण्ड पेपरवर कर्जरोखा, वचनचिठ्ठी, सेव्हिंग किंवा पगार खात्यातून रक्कम वळती करून घेणेचे जामीनदार यांचे अधिकार पत्र.

०५. टॅब खरेदीबाबत विक्रेत्याचे कोटेशन.

०६. लाभार्थी व जामिनदार हे कोणत्याही संस्थेकडील अगर बँकेकडील कर्जाचे थकबाकीदार नसावेत व तसे प्रतिज्ञापत्र साध्या पेपरवर सोबतच्या नमुन्यात करून दिले पाहिजे.

०७. पालक किंवा जामीनदार यांची कर्ज रक्कमेएवढी ठेव कर्ज मुदतीपर्यंतच्या कालावधीसाठी असल्यास अन्य कागदपत्रांची आवश्यकता राहणार नाही.